महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# नेमाडेंच्या साहित्याचे 'इ-बुक

27 Aug 2011, 0825 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

म . टा . प्रतिनिधी

ज्येष्ठ साहित्यिक प्रा . भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य आता www.bookganga.com या वेबसाइटवरून इ - बुकच्या स्वरूपात वाचकांपुढे येत आहे . प्रभादेवी येथील पु . ल . देशपांडे कला अकादमीत रविवारी ( ता . २८ ) सायंकाळी ७ वाजता या इ - बुकचे प्रकाशन डॉ . भालचंद्र मुणगेकर ह्यांच्या हस्ते होणार आहे .

भारतीय साहित्यातील उत्तमोत्तम पुस्तके बुकगंगा डॉट कॉम या संकेत स्थळावरून उपलब्ध करून दिली जात आहेत . त्याचाच एक भाग म्हणून नेमाडेंचे सर्व साहित्य आता इ - बुकच्या माध्यमातून वाचकांना वाचायला मिळणार आहे . बुकगंगा डॉट कॉम ने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले असून आपल्या कॅम्प्युटरवर आणि आयपॅडवर साहित्य डाउनलोड करून वाचता येऊ शकेल . त्यानुसार नेमाडे यांच्या सर्व साहित्याच्या ई - बुक आवृत्या तयार करण्यात आल्या आहेत . प्रकाशन समारंभात शशिकांत सावंत प्रा . नेमाडे यांच्याशी त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल चर्चा करणार आहेत .